


# श्रीमाताजींचे प्रतीक



# अभीप्सा

अखिल भारतीय पत्रिका

एप्रिल २०२४

वर्ष ४९ अंक ०४

# श्रीमाताजी



**श्रीमाताजींचे तुमच्याकडे लक्ष आहे असे समजून नेहमी वागत चला; कारण त्या खरोखरच नित्य उपस्थित असतात.**

– श्रीअरविंद (CWSA 32 : 169)

*

# अभीप्सा

(ईश्वराप्रति असलेली आस)

**प्रकृती ती जड । करील उघड । ईश्वरी ते रूप । सुघटित ।।**

**प्रकाशक**

श्री. प्रदीप नारंग, पुडुचेरी

**प्रकाशन स्थळ**

श्रीअरविंद सोसायटी

सोसायटी हाऊस, ११ सेंट मार्टिन स्ट्रीट, पुडुचेरी – ६०५००१

**संपादक**

डॉ. केतकी मोडक, पुणे

भ्रमणध्वनी : ९४२१०१६०८९

ई–मेल : editorabhipsa2018@gmail.com

**मुद्रक**

सेन्थिल ऑण्डवर प्रेस, पुडुचेरी – ६०५००१

**चिंतनार्थ...**

उमदेपणा, उदात्तता आणि औदार्य हे आत्म्याचे संपूर्ण नभोमंडल आहे. त्यांच्याविना, व्यक्ती ही एका अंधारकोठडीतल्या किड्याप्रमाणे भासते.

उदात्तपणा म्हणजे सर्व वैयक्तिक लाभ–हानीच्या हिशोबांना नकार देणे. औदार्य म्हणजे दुसऱ्यांच्या समाधानामध्ये स्वतःचे समाधान शोधणे.

(CWSA 12 : 456), (CWM 10 : 282)

*

## श्रीमाताजींचे प्रतीक

संपादकीय..........................................................०२
प्रतीकांचे अर्थ......................................................०३
श्रीअरविंदांचे प्रतीक..............................................०६
श्रीमाताजींचे प्रतीक................................................०७
पूर्णयोगाची साधना..................................................०९
श्रीमाताजींच्या स्वाक्षरीतील प्रतीकात्मकता................................१०
श्रीअरविंद इंटरनॅशनल सेंटर ऑफ एज्युकेशनचे प्रतीक................११
बारा गुणवैशिष्ट्ये....................................................१२
पराशक्ती...............................................................२२

---

## संपादकीय

प्रतीकं ही वास्तविकतेचे प्रतिनिधित्व करत असतात आणि ती वास्तविकतेला बुद्धिगम्य करत असतात. प्रतीकांच्या माध्यमातून आपण त्या वास्तविकतेपर्यंत जाऊन पोहोचू शकतो. अर्थात त्या प्रतीकांचे केवळ मानसिक आकलन पुरेसे नसते तर त्यामधून प्रतिबिंबित होणारे गहन सत्य जगण्याचा आपण प्रयत्न केला पाहिजे. 'अभीप्सा' मासिकाचा एप्रिल महिन्याचा अंक, प्रतीकांकडे कोणत्या भूमिकेतून पाहिले पाहिजे यावर प्रकाश टाकणारा आहे.

संपादक, अभीप्सा मासिक

**

---

अभीप्सा मासिक हे श्रीअरविंद सोसायटी, पाँडिचेरीचे मुखपत्र आहे.

योगी श्रीअरविंद म्हणजे पूर्वाश्रमीचे क्रांतिकारक अरविंद घोष आणि श्रीमाताजी म्हणजे पूर्वाश्रमीच्या मीरा अल्फासा, (फ्रान्स). 'श्रीअरविंद आश्रम' हा भारताच्या पूर्व किनाऱ्यावर पाँडिचेरी येथे आहे.

# प्रतीकांचे अर्थ

## प्रतीकं आणि त्यांचे प्रकार

मला वाटते, प्रतीक हा एका स्तरावरील असा आकार असतो की जो दुसऱ्या स्तरावरील सत्याचे प्रतिनिधित्व करत असतो. उदाहरणार्थ, ध्वज हे राष्ट्राचे प्रतीक असते. साधारणत: सर्व आकार ही प्रतीकं असतात. आपले शरीर हे आपल्या सत् अस्तित्वाचे प्रतीक आहे आणि (याचप्रकारे,) प्रत्येक गोष्ट ही त्याहून एखाद्या उच्चतर सत्याचे प्रतीक असते.


प्रतीकं  विविध प्रकारची असतात.

पारंपरिक प्रतीकं – उदा. वैदिक ऋषींनी त्यांच्या सभोवतालच्या परिसरातील वस्तुंच्या आधारे तयार केलेली प्रतीकं. गाय हे प्रकाशाचे प्रतीक आहे कारण 'गो' या एकाच शब्दाने किरण आणि गाय या दोन्हीचा अर्थबोध होतो. ज्या गायीवर ऋषींच्या जीवनाचा चरितार्थ चालत असे, ती गाय त्यांच्यासाठी अत्यंत मौल्यवान अशी संपत्ती होती आणि तिच्याबाबतीत नेहमीच चोरीचा आणि ती लपविली जाण्याचा धोका असे. एकदा प्रतीक तयार झाले की मग ते अर्थवाही होते. ऋषींनी त्यात प्राण ओतला आणि मग ते प्रतीक त्यांच्या साक्षात्काराचा एक भाग बनले. गाय ही आध्यात्मिक प्रकाशाचे चित्ररूप बनून त्यांच्या दृष्टान्तांमध्ये साकारली. अश्व हे सुद्धा त्यांचे एक आवडते प्रतीक होते. आणि त्याची शक्ती व ऊर्जा या गोष्टी सुस्पष्ट असल्याने ते प्रतीक अधिक सहजतेने स्वीकारले गेले.

आपण ज्यांना 'जीवन–प्रतीकं' असे संबोधू शकतो अशीही काही प्रतीकं असतात. ती प्रतीकं कृत्रिमरितीने निवडण्यात आलेली किंवा त्यांचे जाणीवपूर्वक हेतुपुरस्सर पद्धतीने मानसिक विवरण केलेले नसते. तर अशी प्रतीकं ही आपल्या दैनंदिन जीवनामधून स्वाभाविकरितीने निष्पन्न झालेली असतात आणि ज्या परिसराच्या आधारे, आपल्या

# श्रीअरविंदांचे प्रतीक





The descending triangle represents Sat-Chit-Ananda.
The ascending triangle represents the aspiring answer from matter under the form of life, light and love.
The junction of both – the central square – is the perfect manifestation having at its centre the Avatar of the Supreme – the lotus.
The water – inside the square – represents the multiplicity, the creation.

अधोमुख त्रिकोण हा सत्–चित्–आनंद यांचे प्रतीक आहे.

प्राण, प्रकाश व प्रेम या रूपातील, पार्थिव तत्त्वाचा अभीप्सारूप प्रतिसाद हा ऊर्ध्वमुख त्रिकोणाने दर्शविला आहे.


दोन्ही त्रिकोणांच्या संधीस्थानी असलेला मध्यावरील चौरस म्हणजे परिपूर्ण आविष्काराचा दर्शक आहे आणि त्याच्या केंद्रस्थानी असणारे कमळ म्हणजे 'परमेश्वरा'चा अवतार आहे.

चौरसातील पाणी हे वैविध्यपूर्ण निर्मितीचे, सृष्टीचे प्रतीक आहे.

– श्रीमाताजी (CWM 13 : 28-29)

**

# श्रीमाताजींचे प्रतीक



श्रीमाताजींच्या प्रतीकामधील केंद्रवर्ती वर्तुळ हे ‘परममाते’चे, ‘महाशक्ती’चे प्रतिनिधित्व करते. मध्यभागी असणाऱ्या चार पाकळ्या या परममातेचे चार पैलू आहेत आणि त्याबाहेरील बारा पाकळ्या हे ‘तिचे’ बारा गुण आहेत.

*

हे प्रतीक म्हणजे महाशक्तीसहित (श्रीमाताजींचे वैश्विक निर्मितीच्या रूपातील) असलेल्या ‘परमचेतने’च्या शुभ्र ‘कमळा’चे प्रातिनिधिक चित्र आहे. मध्यभागी त्यांचे चार पैलू आणि त्यांचे बारा गुण दर्शविले आहेत.

*

केंद्रवर्ती वर्तुळ हे ‘दिव्य चेतने’चे प्रतीक आहे. चार पाकळ्या या श्रीमाताजींच्या चार शक्तींचे प्रतिनिधित्व करतात. श्रीमाताजींच्या कार्यासाठी ज्या बारा शक्ती आविष्कृत झाल्या आहेत त्यांचे प्रतिनिधित्व बारा पाकळ्या करतात.

– श्रीमाताजी (CWM 13 : 63-64)

*

साधक : मी नेहमी माताजींच्या प्रतीकाचा (चक्र) आणि त्याच्या अर्थाचा विचार करत असतो. त्याचा मला उमगलेला अर्थ असा आहे की, मध्यभागी असलेले वर्तुळ म्हणजे ‘विश्वातीत’ शक्ती. आतल्या चार पाकळ्या म्हणजे ‘अतिमानसा’कडून ‘अधिमानसा’पर्यंत कार्यरत असलेल्या चार शक्ती. बाहेरच्या बारा पाकळ्या, ज्या चार गटांमध्ये विभागलेल्या आहेत, त्या ‘अधिमानसा’कडून ‘स्फूर्तिमय मन’ आणि मन यांच्याकडे जाणाऱ्या बारा शक्ती आहेत. माझी ही संकल्पना योग्य आहे का?

नमस्कार वाचकहो,

अभीप्सा मासिकातील काही पाने आपल्या अवलोकनार्थ येथे देण्यात आली होती. आपल्याला ह्या अंकातील विषयावरील आणि यासारख्या इतर विषयांवरील श्रीअरविंद आणि श्रीमाताजी यांचे विचार मराठीत समजून घ्यावयाचे असतील तर, आपण अभीप्सा मासिकाचे वर्गणीदार व्हावे, ही विनंती.

वर्गणीचा तपशील शेजारील पानावर दिला आहे.

– संपादक, अभीप्सा मासिक

## मासिकाचे स्वरूप

श्रीअरविंदांचे बहुतांशी सारे साहित्य मुळात इंग्रजी व बंगाली भाषेत आहे. तर श्रीमाताजी यांचे बहुतांशी वाङ्मय फ्रेंच व इंग्रजी भाषेत आहे. हे दुर्मिळ विचारधन मराठीत आणण्याचे प्रयत्न 'अभीप्सा' या मासिकाच्या माध्यमातून अव्याहतपणे चालू आहेत. पाँडिचेरीहून प्रकाशित होणाऱ्या श्रीअरविंद सोसायटीचे मुखपत्र असलेल्या 'ऑल इंडिया मॅगेझिन' या इंग्रजी मासिकाची मराठी आवृत्ती म्हणजे 'अभीप्सा.' १९७६ पासून हे मासिक नियमितपणे प्रकाशित होत आहे.

### वर्गणी व देणगीचा तपशील

वार्षिक वर्गणी : २०० रू. (१२ अंक)
तीन वर्षाचे दर : ५८० रू. (३६ अंक)
पाच वर्षांचे दर : ९६० रू. (६० अंक)
देणगीदार : ४००० रू.
(देणग्या 80 G अंतर्गत करसवलतीस पात्र आहेत.)

वर्गणी वा देणगीची रक्कम आपण ऑनलाईनदेखील भरू शकता.

### वर्गणी वा देणगी ऑनलाईन भरण्यासाठी बँकेचा तपशील

खातेदाराचे नाव : Sri Aurobindo Society
बँकेचे नाव : Central Bank of India
IFSC Code : CBIN0281354
A/C No. : 1235467709

*

**सूचना :** रक्कम भरल्याची पोहोचपावती व आपला संपूर्ण पत्ता membership@aurosociety.org आणि editorabhipsa2018@gmail.com या ईमेल आयडीवर पाठवावा ही विनंती; म्हणजे आपल्या पत्त्यावर अंक पाठवता येईल.

*

वर्गणीदारांना काही कारणाने अंक उपलब्ध न झाल्यास पुढील क्रमांकावर संपर्क करावा – श्री. गोविंद पोतदार ९३७३७२४५२०

# ...त्यामुळे माझे कार्य सोपे होईल

श्रीमाताजी जेव्हा शारीर–चेतनेवर काम करत होत्या त्या काळातील ही गोष्ट आहे. मनुष्याचे शरीर उच्चतर चेतना, सत्य, प्रकाश ग्रहण करण्यास आणि ते आविष्कृत करण्यास कितपत सक्षम आहे, यावर त्यांचे प्रयोग चालू होते. परिणामतः बरेचदा त्यांची तब्येत बिघडत असे. तेव्हा मोना सरकार या साधकाने त्यांना असे विचारले की, ''तुमची तब्येत जेव्हा ठीक नसते तेव्हा आम्ही काय करावे ?''

तेव्हा श्रीमाताजी त्यांना म्हणाल्या, ''माझे कार्य अधिक सुकर व्हावे असे जर तुम्हाला वाटत असेल तर तुम्ही अधिकाधिक प्रामाणिक झाले पाहिजे. अगदी निष्ठापूर्वक प्रामाणिक राहिले पाहिजे म्हणजे कोणतीच गोष्ट अंधकाराच्या संपर्कात राहू शकणार नाही. ही एकच गोष्ट करणे आवश्यक आहे. माझी चेतना जेव्हा व्यापक होत असते तेव्हा माझ्या अवतीभोवती असणाऱ्या सर्वांच्या चेतनेशी मी कमीअधिक प्रमाणात एकात्म पावते, त्यामुळे तुमच्यामधील अशुद्धता माझ्यामध्ये प्रवेश करते हे तुम्ही लक्षात घेतले पाहिजे. तुम्ही जे अर्धवट सोडून देता किंवा तुमच्यामध्ये जी काही अशुद्धता शिल्लक राहते, तेव्हा तुमच्यामध्ये अपूर्ण राहिलेले शुद्धीकरणाचे ते काम मलाच पूर्ण करावे लागते. आणि ते काम माझ्या या देहासाठी अतिरिक्त काम होऊन बसते. परंतु तुमच्या बाजूने जर तुम्ही प्रामाणिक असाल, म्हणजे तुमच्या व्यक्तित्वाच्या सर्व घटकांचे शुद्धीकरण करण्यात जर तुम्ही प्रामाणिक असाल तर मग, मला कोणतीच गोष्ट बाधक ठरणार नाही. किंवा प्रत्येकाने स्वतःच्या शुद्धीकरणासाठी थोडे का होईना, जर प्रयत्न केले तर, त्यासाठी मला जो वेळ खर्च करावा लागतो तो वेळ वाचेल. आणि माझे तेवढे कष्ट वाचतील. आणि त्यामुळे माझे कार्य सोपे होईल.''

आता श्रीमाताजी ९३ वर्षे वयाच्या झाल्या होत्या. त्या त्यांच्या देहावर जे प्रयोग करत होत्या, त्यामुळे त्यांचा देह आता अधिकाधिक थकत चालला होता. त्यांना शरीराचे जणू तुकडेतुकडे होत असल्याइतक्या वेदना होत असत. परंतु त्याही स्थितीमध्ये त्यांना वैश्विक चेतना ही अधिकाधिक सुस्पष्ट, सशक्त होताना जाणवत असे. त्या अवस्थेमध्येही केवळ भारतासाठी नव्हे तर जगासाठी त्या कार्यरत होत्या. ऑरोविलचा आत्मा असणाऱ्या मातृमंदिराच्या पायाभरणीसाठी आवश्यक असणाऱ्या मार्गदर्शक सूचना त्या देत होत्या...

– आधारित (Blessings of the Grace by Mona Sirkar)

*

## आजवर दर्शनदिनी देण्यात आलेले संदेश (क्रमशः)

### ०१ जानेवारी २००१

पृथ्वीच्या प्राचीन इतिहासामध्ये, संक्रमणाच्या काही घटिका अशा येत असतात की, जेव्हा हजारो वर्षे आपले अस्तित्व टिकवून असलेल्या गोष्टींनी, आविष्कृत होऊ घातलेल्या नवीन गोष्टींना मार्ग मोकळा करून देणेच आवश्यक असते. अशा घटिकांच्या वेळी पृथ्वी-चेतनेचे विशेष केंद्रीकरण होत असते, आपण असेही म्हणू शकतो की, तिचे प्रयत्न अधिक तीव्र होत असतात. जी प्रगती करणे आवश्यक असते त्यानुसार, जे रूपांतरण प्रत्यक्षात घडवून आणायचे आहे त्याच्या दर्जानुसार त्यामध्ये विभिन्नता असू शकेल.

या जगाच्या इतिहासामध्ये आत्ता आपण अशाच एका वळणावर उभे आहोत. 'प्रकृती'ने ज्याप्रमाणे या अगोदर मनोमय पुरुष, मनुष्य घडविला आहे, त्याचप्रमाणे या मानसिकतेमध्येच आता एक एकाग्रतेची कृती दिसून येत आहे, अतिमानसिक चेतना आणि व्यक्तित्व पुढे आणण्याची ही तयारी आहे.

– श्रीमाताजी (CWM 12 : 72)

*

### २१ फेब्रुवारी २००१

ईश्वराप्रति आणि श्रीमाताजींप्रति आत्म-समर्पण, मग भलेही ते कितीही कठीण असले तरीही, तेच आपले एकमात्र प्रभावशाली साधन असले पाहिजे आणि तेच आपले एकमेव कायमस्वरूपी आश्रयस्थान असले पाहिजे.

– श्रीअरविंद (CWSA 12 : 171)

*